अपिल क्रमांक २८/२०२४

**श्री. अजितकुमार विष्णू देठे,**

विरुध्द...

**फोंडाघाट एज्युकेशन सोसायटी, फोंडाघाट ता. कणकवली जि. सिंधुदूर्ग व इतर**

**निशानी क्र. ३७ खालील आदेश**

(दिनांक १९/११/२०२५)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी अपिलकार यांचेमार्फत न्यायालयात प्रकरण तहकुबीकरीता सादर केला आहे. सदर अर्जावर अपिलकार यांचे विद्यमान विधिज्ञ यांनी आक्षेप नोंदविला.

२. प्रकरणाची परिस्थिती पाहता प्रतिवादी क्र. ४ यांनी निशानी ३१ सोबतच्या नोटीस लागूबाबतच्या डाक अहवालावरून दिनांक ०६.०१.२०२५ रोजी नोटीस मिळाल्याचे दिसून येते. कायद्याची परिस्थिती पाहता नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर होवून म्हणणे देणे गरजेचे आहे. सदरची कालमर्यादा जास्तीत जास्त ६० दिवस व ९० दिवसांपर्यंत वाढविता येते. अन्यथा लेखी म्हणणे नाही म्हणून प्रकरण पुढे चालविले जाते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ४ यांनी वेळेमध्ये म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यांचे लेखी म्हणणेशिवाय प्रकरण पुढे सुरू ठेवणेत आले. सबब, प्रस्तुतचे प्रकरण मूळ अपिलास म्हणणे देण्याकरीता तहकुब करता येणार नाही.

३. प्रतिवादी क्र. ४ हे शिक्षणाधिकारी, माध्यमिक जि.प सिंधुदूर्ग असून सदर कार्यालयामार्फत प्रतिनिधी गैरहजर असून वर नमूद केलेप्रमाणे अपिलकाराने प्रस्तुतचा अर्ज हजर केला आहे. अपिलकार यांना जि. प. सिंधुदूर्ग येथून अर्ज घेवून या न्यायाधिकरणात हजर करण्याचे अधिकार नाहीत अथवा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि. प. सिंधुदूर्ग यांना देखील परस्पर अपिलकाराकडून अर्ज पाठविण्याची मुभा अथवा अधिकार नाहीत. यावरून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि. प. सिंधुदूर्ग यांच्या मनमानी कारभाराची झलक यावरून दिसते. शासकीय कार्यालयातील अधिकृत कागदपत्र असे

संबंधित अधिकारी अथवा प्रतिनिधीशिवाय वैयक्तिकरित्या अपिलकाराकडे न्यायाधिकरणाकडे परस्पर पाठवून देणे हे पत्रव्यवहाराच्या व न्यायालयीन कामकाजाच्या शिष्टाचारात बसत नाही. सबब, सदर बाब शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग कोल्हापूर, यांना कळवून यापुढे पत्रव्यवहाराचे शिष्टाचार संबंधितांनी पाळावेत याबाबतच्या सूचना देण्याचे निर्देश देणेत येत आहेत.

४. अपिलकार यांच्या वर्तनाची नोंद या न्यायाधिकरणाचे घेतली आहे, भविष्यात त्यांचे वर्तन न सुधारल्यास याबाबतची योग्य ती दखल घेतली जाईल.

Digitally signed by VAISHALI NIVRUTI DHAVLE
Date: 2025.11.20 18:18:27 +0530

तारीख – १९/११/२०२५
ठिकाण - कोल्हापूर

(वै. नि. ढवळे)
पीठासीन अधिकारी,
शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर